# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 July 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ जुलै २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांच्यासह चार मान्यवरांची राष्ट्रपतींकडून राज्यसभेवर नियुक्ती
- बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांबाबत राज्यांनी कडक कारवाई करण्याचे केंद्र सरकारचे निर्देश
- राज्यात दोषसिद्धीचं प्रमाण ९० टक्क्यांवर नेण्याचं उद्दीष्ट– मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचा परतीचा प्रवास आजपासून सुरु

आणि

- लॉर्डस कसोटीत विजयासाठी भारताला १३५ धावांची आवश्यकता

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची राज्यसभेसाठी सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. निकम यांच्यासह समाजसेवक सी. सदानंदन मास्टर, माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन शृंगला, इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. मीनाक्षी जैन यांचीही नियुक्ती झाल्याची अधिसूचना गृह मंत्रालयानं काल जारी केली. उज्ज्वल निकम यांनी मुंबईवर दहशतवादी हल्ला प्रकरणात सरकारी वकील म्हणून काम केलं होतं. सदानंद मास्टर हे केरळचे असून, त्यांनी शिक्षण क्षेत्रात मोलाचं योगदान दिलं आहे. हर्षवर्धन शृंगला यांनी अमेरिका, बांग्लादेश आणि थायलंड इथं भारताचे राजदूत म्हणून काम केलं, तसंच ते २०२३ मध्ये भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या G –20 शिखर परिषदेचे मुख्य समन्वयक म्हणून कार्यरत होते. डॉ. मीनाक्षी जैन या दिल्लीच्या गार्गी महाविद्यालयात इतिहासाच्या सहयोगी प्राध्यापक आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या चारही मान्यवरांचं अभिनंदन केलं आहे. उज्ज्वल निकम यांची कायद्याच्या क्षेत्रातली आणि संविधानाप्रती असलेली निष्ठा अनुकरणीय आहे, ते यशस्वी वकील असून, अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये न्याय मिळवून देण्यासाठी आघाडीवर राहिले आहेत, असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरच्या संदेशात नमूद केलं.

राज्यसभा सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल उज्ज्वल निकम यांनी या शब्दात प्रतिक्रिया व्यक्त केली.

**बाईट– ज्येष्ठ विधीज्ञ उज्जवल निकम**

****

बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांबाबत सर्व राज्य तसंच केंद्रशासित प्रदेशांनी त्वरित कडक कारवाई करावी, असे निर्देश, केंद्र सरकारनं दिले आहेत. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी सर्व मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे हे निर्देश दिले. देशभरात बनावट खतांचं वितरण, खतांचा काळा बाजार तसंच, खतांच्या गोण्यांवर खोटी लेबलं लावण्यासारख्या अवैध गोष्टींना आळा घालायच्या उद्देशानं हे पत्र कृषीमंत्र्यांनी लिहिलं आहे. खतांचा पुरेसा साठा जागोजागी आणि गरजेच्या ठिकाणी उपलब्ध करून देणं ही राज्य सरकारांची जबाबदारी असल्याचं त्यांनी सांगितलं. याकरता दोषी आढळलेल्यांचे खतवितरण परवाने रद्द करून राज्य सरकारांनी गुन्हे दाखल करावेत, असंही त्यांनी म्हटलं आहे.

****

राज्यात दोषसिद्धीचं प्रमाण ९० टक्क्यांवर नेण्याचं उद्दीष्ट असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर मधल्या धंतोली परिसरात प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोग शाळेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचं भूमिपूजन आणि गृह विभागाच्या तीन नवीन प्रकल्पांचं ऑनलाईन लोकार्पण काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. २०१३ मध्ये राज्यात दोषसिद्धीचं प्रमाण नऊ टक्के होतं, ते आज ५४ टक्क्यावर गेलं असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**बाईट– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

आधुनिक सायबर प्रयोग शाळांसह, मोबाईल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारल्या जात असून, तंत्रज्ञान, सायबर आणि फसवणुकीचे वाढते गुन्हे लक्षात घेता, येत्या काळात लोकाभिमुख आणि ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करुन,

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था अधिक मजबूत करण्यात येईल, असंही मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्रात देशातली सर्वात अत्याधुनिक, सायबर न्याय सहायक वैज्ञानिक व्यवस्था निर्माण करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, नागपूरमध्ये काल वार्ताहरांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी, जनसुरक्षा कायद्याला विरोध करणाऱ्यांवर टीका केली. या विधेयकाला विरोध करणाऱ्यांनी संपूर्ण वाचन न करता मतप्रदर्शन केलं, आधी पूर्ण माहिती घेऊनच भुमिका घ्यावी, असं त्यांनी सूचित केलं.

****

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचा परतीचा प्रवास आज सुरु होईल. ग्रुप कॅप्टन शुक्ला यांच्यासह आणखी तीन अंतराळवीरांना घेऊन ॲक्सियॉम – फोर हे अंतराळ यान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरुन भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी साडेचार वाजता रवाना होईल. हे यान उद्या मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास पृथ्वीवर उतरेल. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली. शुभांशु शुक्ला यांनी भारतासाठी अंतराळात एकूण सात प्रयोग केले आहेत.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २७ जुलैला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२४ वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरीकांनी आपल्या सूचना येत्या २५ तारखेपर्यंत माय जी ओ व्ही डॉट इन संकेतस्थळ तसंच नि:शुल्क दूरध्वनी क्रमांक एक आठ शून्य शून्य एक एक सात आठ शून्य यावर नोंदवाव्यात असं आवाहन करण्यात आलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगरमधल्या शाळांमध्ये दर्जात्मक सुधारणा व्हावी आणि गुणवत्तेचा आढावा घेण्यासाठी १५ ते ३१ जुलै दरम्यान शाळांची तपासणी केली जाणार आहे. जिल्ह्यातल्या २२४ शाळांच्या तपासणीसाठी ६५ पथकं तयार केली आहेत. प्रत्येक पथकात चार सदस्य असून, ते प्रत्येकी सहा शाळांची तपासणी करतील. राज्य शाळा मानक प्राधिकरण, शाळा गुणवत्ता आणि आश्वासन आराखडा याअंतर्गत राज्यातल्या सर्व शाळांना स्वमूल्यांकन करण्याचे आदेश दिले होते. या पथकांनी १५

दिवसांत सहा शाळांची तपासणी करून आवश्यक अहवाल सादर करणं बंधनकारक आहे.

****

क्रिकेट

लॉर्डस कसोटीत विजयासाठी १९३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघानं काल चौथ्या दिवसअखेर चार बाद ५८ धावा केल्या आहेत. अतिशय नाट्यमय घडामोडींनी युक्त चौथ्या दिवशी एकूण १४ गडी बाद झाले. जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज आणि वॉशिंग्टन सुंदरच्या प्रभावी गोलंदाजीमुळे इंग्लंडचा दुसरा डाव १९२ धावांत संपुष्टात आला. वॉशिंग्टन सुंदरनं अवघ्या २२ धावा देत ४ बळी टिपले. भारतीय संघाला विजयासाठी अजून १३५ धावांची आवश्यकता आहे. सलामीवीर के एल राहुल ३३ धावांवर खेळत आहे.

****

अव्वल मानांकित इटलीच्या यानिक सिनरनं विम्बल्डन टेनिस स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं आहे. काल झालेल्या अंतिम सामन्यात त्याने कार्लोस अल्कराज याचा चार – सहा, सहा – चार, सहा – चार, सहा – चार असा पराभव केला. सिनरचं हे पहिलंच विम्बल्डन विजेतेपद आणि चौथं ग्रँड स्लॅम विजेतेपद आहे.

****

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी सहाय्यक संघटनेतर्फे विविध मागण्यांसाठी आज मुंबईत विधान भवनावर मोर्चा काढण्यात येणार आहे. राज्यातल्या एक लाख ३४ हजार युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांना कायमस्वरूपी रोजगार, मानधनात वाढ यासह अन्य मागण्यांसाठी हा मोर्चा असल्याची माहिती, संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर यांनी लातूरमध्ये दिली.

****

यवतमाळ इथं प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख माजी आमदार बच्चू कडू यांची सातबारा कोरा यात्रा सुरू आहे. यात्रेच्या काल सातव्या दिवशी बच्चू कडू आणि पदयात्रेत सहभागी शेतकरी– शेतमजुरांनी डोळ्यावर काळ्या पट्ट्या बांधून सहभाग नोंदवला. शेतकरी, दिव्यांग, भोई, मेंढपाळ यांच्यावरच्या अन्यायाकडे राज्य शासनाचं लक्ष वेधण्यासाठी ही यात्रा काढण्यात आली असल्याचं बच्चू कडू यांनी सांगितलं.

****

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीच्या औचित्यानं आणि एक पेड माँ के नाम अभियानाअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यात हिवरेबाजार इथं मातृस्मृती वनमंदिरात काल वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे आणि आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते रोपं लावण्यात आली.

****

लातूर जिल्ह्यातल्या जिल्हा परिषदेच्या ५९ जागा आणि त्याअंतर्गत सर्व पंचायत समित्यांच्या ११८ जागांसाठी निवडणूक प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार आज प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे.बीड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना देखील आज प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

****

हवामान विभागाने पुढील काही दिवस महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. आज तळकोकणासह रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे. जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात राज्यात पावसाचं प्रमाण तुलनेत कमी राहण्याची शक्यता आहे.

****